**नियमित दिवाणी दावा क्र. १९०/२०१५ निशाणी २३ खालील आदेश**

**लताबाई गाढवे वि. बबन दोरगे**

प्रतिवादीने प्रस्तुतचा अर्ज दाव्याच्या वैधतेबाबत प्राथमिक मुद्दे काढणेकरिता दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादीचे थोडक्यात कथन असे आहे की, वादीने प्रस्तुतचा दावा जाहीर ठराव, मनाई हुकूम, वाटप तसेच खरेदीखत व हक्क सोडपत्र रद्द करुन मिळणेकरिता दाखल केलेला आहे. प्रतिवादीने प्रस्तुत दाव्यामध्ये हजर होउन दावा हा मुदतीत दाखल केलेला नाही तसेच योग्य तो कोर्ट फि स्टॅम्प भरलेला नसलेने प्रस्तुतचा कथित केलेले प्राथमिक मुद्दे काढणेची विनंती केली आहे.

३. वादीने प्रस्तुत अर्जास नि २५ वर म्हणणे देवून प्रतिवादीचा अर्ज कायदेशीर नसुन कोणत्याही संयुक्तीक कारणाशिवाय दाखल केलेला आहे. वादींना प्रतिवादीने केलेले खरेदीखत दस्त क्र १८५९/९७, १२४४/८४, या खरेदीखताबाबत कोणतीही माहिती नव्हती. सदर खरेदीखताचे ज्ञान वादीस दि ३१.०५.२०१३ रोजी झालेले आहे. वादीने दावा हा खरेदीखत रद्द करुन मिळणेकरिता दाखल केला असून वादीस ज्ञान झाल्यापासुन ३ वर्षात दावा दाखल केलेला असल्याने प्रस्तुतचा दावा हा मुदतीमध्ये दाखल केलेला आहे. वादीने दाव्यास आवश्यक असणारा कोर्ट फि स्टॅम्प दाव्यासोबत दाखल केलेला आहे. दोन्ही बाबी या न्यायालयासमोर दोन्ही पक्षाचा पुरावा आल्यानंतर सिद्ध होईल. केवळ दाव्याचे कामकाज लांबणीवर टाकण्याकरिता सदरचा अर्ज प्रतिवादीने दाखल केला आहे. करिता अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

४. खालील मुद्दे अर्जाच्या निकाल निश्चिती करिता उपस्थित झाले. त्यांचेवरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसह नोंदवित आहे.

| अ.क | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | प्रस्तुतचा अर्ज मंजुर होणेस पात्र आहे काय? | होकारार्थी. |
| २. | आदेश काय? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

०५. **मुद्दा क १ करिता:—** प्रतिवादीचा अर्ज, अर्जास म्हणणे, कागदोपत्री पुरावा यांचे अवलोकन केले. दोन्ही पक्षाचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतचा दावा वादीने जाहीर ठराव व मनाई हुकूम वाटप तसेच खरेदीखत व हक्क सोडपत्र रद्द करुन मिळणेकरिता दाखल केला आहे. प्रतिवादी क १ ने दावा मिळकतीपैकी खरेदीखत त्याचा दस्त क २२४४/८४ दि २२.०५.१९८४ तसेच खरेदी खत दस्त क १८५९/९७ दि. २९.११.१९९७ रोजीचे दस्त बेकायदेशीर तसेच पोकळी ग्रस्त असल्याने रद्द करुन मागितले आहे. दावा हा सदर दस्त अस्तित्वात असल्यापासुन ३ वर्षात दाखल होणे आवश्यक होते परंतु वादीच्या कथनानुसार सदर दस्ताबाबत तिस दि. १३.०८.२०१३ रोजी माहिती झाली. दाव्यास लावलेला स्टॅम्प हा दावा मिळकतीच्या किंमतीवर जोडणे आवश्यक आहे असे प्रतिवादीचे मत आहे परंतु वादीच्या कथनानुसार दाव्याचे केलेले मुल्यांकन योग्य केले असून लावलेला मुद्रांक हा स्टॅम्प ॲक्ट नुसार लावलेला आहे.

०६. दोन्ही बाजुच्या कथनाचा विचार केला असता दावा हा मुदतीत दाखल आहे अथवा नाही तसेच दाव्याचे मुल्यांकन व दाव्यास लावलेला कोर्ट फि स्टॅम्प या बाबीमुळे दाव्यात तांत्रीक दोष राहु नये या करिता दोन्ही बाजुंचे विस्तृत पुरावे न्यायालयासमोर येणे आवश्यक आहे. वरील बाबींची दोन्ही मुद्दे हे दाव्याचे सुनावणी सुरु होणे अगोदरच निश्चित होणे आवश्यक आहे. त्यामुळे दोन्ही पक्षाचा वेळ, खर्च वाया जाणार नाही. तसेच न्यायालयास सदर

मुद्यावरील विस्तृत पुरावा आल्यानंतर न्यायदानाचे कामात मदत होईल. दोन्ही बाजुचे म्हणणे कथित मुद्यावर आल्यावर सर्व बाबी न्यायालयासमोर येतील. न्यायदान प्रक्रिया सुलभ होण्याकरिता कथित मुद्याचा विचार होणे कायदयातंर्गत असल्याचे न्यायालयाचे मत आहे. करिता मुद्या क्र १ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे.

**०७. <u>मुद्दा क २ बाबतः—</u>** मुद्दा क्र १ चे उत्तर होकारार्थी नोंदविल्याने प्रतिवादी प्राथमिक मुद्ये काढल्याची बाब सिद्ध करण्यात यशस्वी ठरले आहेत. करिता मुद्दा क्र २ च्या उत्तराकरिता पुढील आदेश पारित करित आहे.

## <u>आदेश</u>

१. प्रतिवादीचा अर्ज मंजूर करण्यात आला .

२. प्राथमिक मुद्ये निशाणी १ वर काढण्यात आलेले आहेत.

३. दोन्ही पक्षकारांना खर्चाबाबत आदेश नाहीत.

सही/—

(मीना प्र.इखे)

२ रे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर,

दिनांक— २०/०२/२०१६

ता. दौंड, जि. पुणे